# मेट्रो ३ प्रकल्पाचा २३ वा बोगदा पूर्ण

मुंबई, ता. २४ : कुलाबा- वांद्रे-सीप्झ या मेट्रो तीनच्या कामातील २३ वा टप्पा पूर्ण झाला आहे. नया नगर ते धारावीतील ५८९.४ मीटरचे अंतर ४१ रिंग्जच्या साह्याने पूर्ण करण्यात आलेॉ. या टप्प्यातील १०.९ कि.मी.पैकी ८.२ कि.मी. भुयारीकरण पूर्ण झाल्याची माहिती मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने (एमएमआरसीएल) दिली.

मेट्रो तीनच्या संपूर्ण भुयारी मार्गिकेत एकूण ३२ टप्पे आहेत. यातील २३ टप्पे आतापर्यंत पूर्ण झाले आहेत. 'गोदावरी दोन' या टनेल बोरिंग मशीनच्या साह्याने पॅकेज सहामधील विद्यानगरी ते छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ हा २.८ कि.मी.चे अंतर दोन हजार ४८ रिंग्जच्या मदतीने गेल्या दोन आठवड्यांपूर्वी पूर्ण करण्यात आले. २२ ऑक्टोबरला 'एमएमआरसीएल'ने २१ वा टप्पा पूर्ण केला होता; तर 'सूर्या २' टनेल बोरिंगची या कामी मदत घेण्यात आली होती. विधान भवन ते चर्चगेट या स्थानकांदरम्यान डाऊन लाईन दिशेने ४८२ मीटरचे अंतर ९० दिवसांत पूर्ण करण्यात आले. धारावी बोगद्याचा २० वा टप्पा बोरिंग मशीन 'कृष्णा २'ने पूर्ण करण्यात आले होते.